**'प्रेस नोट'** दिनांक ०३/१०/२०२६

## " मो/सायकल वरुन सोनसाखळी खेचून जबरी चोरी करणा-या सराईत आरोपींना अटक करुन एकुण- ५,७५,०००/- रू. किंमतीची मालमत्ता हस्तगत केलेबाबत "

पार्कसाईट पोलीस ठाणे गु.र.क्र ९२५/२०२६ कलम ३०९(४),३(५) भा.न्या.सं २०२३ अन्वये मो/सायकल वरुन आलेल्या दोन इसमांनी फिर्यादीस धक्का देवून त्यांचे २२ ग्रॅम वजनाचे सोन्याचे मंगळसूत्र जबरीने चोरी केलेबाबत गुन्हा नोंद करण्यात आला होता. पोलीसांनी सदरचा गुन्हा दाखल करुन तपास सुरु केला होता.गुन्हे प्रकटीकरण पथकाचे सपोनि नितीन झाडे, सपोनि अतुल ठोंबरे व पथकाने गुन्हयाचे घटनास्थळ, एल.बी.एस.मार्ग व आजुबाजुच्या परिसरातील सी.सी.टी.व्ही.फुटेज व तांत्रिक माहितीच्या आधारे पाहिजे आरोपीताचा मागोवा काढुन सराईत आरोपी नामे १) शुभम सुखराम चौधरी वय - २७ वर्षे २) अजय उर्फ डब्लु मुन्नीलाल गुप्ता वय २८ वर्षे दोघे राहणार ठिकाण-अॅन्टॉप हिल, मुंबई यांना अटक करुन १) पार्कसाईट पोलीस ठाणे गु.र.क्र ९२५/२०२६ २) गु.र.क्र ९०८/२०२६ कलम ३०९(४),३(५) भा.न्या.सं ३) भांडूप पोलीस ठाणे गु.र.क्र ९२५/२०२६ कलम ३०३(२) भा.न्या.सं ४) घाटकोपर पोलीस ठाणे गु.र.क्र १०६१/२०२६ कलम ३०३(२) भा.न्या.सं हे ०४ गुन्हे उघडकीस आणले तसेच आरोपीतांकडे कौशल्यपुर्ण तपास करुन ०२ मोटार वाहनांसह **एकुण- ५,७५,०००/- रू.** किंमतीची मालमत्ता हस्तगत केली आहे.

सदरची कामगिरी मा.श्री. देवन भारती, पोलीस आयुक्त सो,बृहन्मुंबई, मा.श्री.मनोज कुमार शर्मा, पोलीस सह आयुक्त (का.व सु.), मा.श्री.धनंजय कुलकर्णी, अप्पर पोलीस आयुक्त, पुर्व प्रादेशिक विभाग, मुंबई, मा.श्री. अभयसिंह देशमुख, पोलीस उप-आयुक्त, पुर्व परिमंडळ-०३,मुंबई, श्रीमती प्राची कर्णे, सहाय्यक पोलीस आयुक्त, विक्रोळी विभाग, मुंबई यांचे मार्गदर्शनाखाली श्री. सचिन सावंत, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, पार्कसाईट पोलीस ठाणे, मुंबई, श्री.अशोक लांडगे (पो.नि. गुन्हे), गुन्हे प्रकटीकरण पथकाचे सपोनि नितीन झाडे, अतुल ठोंबरे व गुंडा विरोधी पथकाचे पोउनि अक्षय वाघ, पोउनि वाल्मिक शिंदे, सफौ/ नुरलहसन मोमीन, पोह राहुल ढोले, पोह विशाल गवारे , पोह राहुल नवले, पोह सुनिल बोरसे, पोशि विक्रम कोल्हे, पोशि मनोज सुरवाडे, पोशि रोहिदास भुसारी, पोशि अनिल उंडे, पोशि दिपक तायडे, पोशि दिपक निकम यांनी कौशल्यपुर्ण तपास करुन सदरची कामगिरी केली आहे.